# प्रकरण - चौथे

# समारोप व निष्कर्ष

# प्रकरण - चौथे

## समारोप व निष्कर्ष

हायकू हा जपानी काव्य प्रकार २५ वर्षापूर्वी मराठीत आणण्याचा प्रयत्न झाला. श्रीमती शिरीष पै यांनी हायकू या काव्य प्रकाराचा अभ्यास करुन मूळ जपानी हायकूचा मराठीत अनुवाद केला. त्यानंतर त्यांनी स्वत: काही हायकू लिहिले. शिरीष पै या निसर्गप्रेमी असल्याने त्यांना तो काव्यप्रकार आवडला. त्यांची प्रवृत्तीसुध्दा हायकू - वृत्तीशी जुळणारी असल्याने त्यांनी अनेक हायकू लिहिले. एवढेच नव्हेतर त्यांचे '' ध्रुवा '', '' हायकूचे दिवस'', '' हायकू '' हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. हा काव्य प्रकार मराठीत रुजविण्याचा त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्यानंतर श्रीमती शांता शेळके, पु. शि. रेगे, सुरेश मथुरे यांनीही काही हायकू लिहिले. त्यासंबंधी ' सत्यकथा ' मासिकातून बरीचशी चर्चाही झाली. अशा या एका नव्या काव्य प्रकाराचा शोध घेण्याचा प्रयत्न या लघु प्रबंधात केला आहे.

पहिल्या प्रकरणात हायकू या काव्यप्रकाराचा परिचय करुन दिला आहे. परकीय साहित्यामधील वाङमयीन प्रकार आणणे काहीसे अवघड असले तरी मर्ढेकरांनी म्हटल्याप्रमाणे ' मराठी साहित्य समृध्द करायचे असेल तर अनेक भाषेतील वाङमयप्रकार मराठीत आणणे आवश्यक आहे.' मराठीवर प्राचीन काळात संस्कृत साहित्याचा आणि अर्वाचीन काळात इंग्रजी साहित्याचा अधिक प्रभाव पडला आहे. प्राचीन काळात संतकवींनी, अभंग, ओवी, भारुड, बालक्रिडा अशा काव्यप्रकारातून भक्तीचा अविष्कार केला. पंडित कवींनी संस्कृत साहित्याच्या आधारे महाकाव्ये, आख्यानकाव्ये हे प्रकारआणले. शाहीर साहित्य कवीनी वीर व शृंगार रसांचा आविष्कार करणारे पोवाडे व लावण्या रचल्या. अशा प्रकारे प्राचीन काळात मराठी काव्याचा विकास झाला. आधुनिक कालखंडात इंग्रजी साहित्याच्या आधारे कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र हे वेगवेगळे वाङमयप्रकार आले.

त्यामध्ये मराठी काव्यात भावकविता, नाट्यगीत, विलापिका, सुनीत हे काव्यप्रकार विशेषत: इंग्रजी साहित्यातील स्वच्छंदवाद. वास्तववाद या प्रवृत्तींचा परिणाम काव्यातील आशयावर झाला. मर्ढेकरांनी वास्तववादाचे चित्रण करण्यासाठी मुक्तछंदात्मक नव कविता इंग्रजीतून मराठीत आणली. अगदी अलिकडच्या काळात शिरीष पै यांनी जपानी भाषेतील ' हायकू ' हा काव्यप्रकार मराठीत आणला. आणि एक नवा प्रवाह निर्माण केला. मराठी काव्यक्षेत्रात संस्कृत व इंग्रजी साहित्यातून कोणकोणते काव्यप्रकार आणले याचा या प्रकरणात प्रारंभी परामर्श घेतला आहे.

' हायकू ' या काव्यप्रकाराचे वैशिष्ट्य सांगताना प्रथम ज्या जपानी भाषेतून हा प्रकार मराठीत आणला. त्याचा जपानमध्ये कसकसा विकास होत गेला त्याची चर्चा केली आहे. ' बाशो' , 'बुसन ', ' इस्सा ' या जपानी कवींनी हायकूचा विकास करुन या काव्यप्रकारात प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. हायकूच्या आशयावर झेन तत्वज्ञानाचा फार मोठा प्रभाव आहे. त्या तत्वज्ञानात ' क्षणाला ' आणि मनुष्य आणि ' निसर्ग ' यांच्यातील ' एकात्मतेला ' फार महत्व आहे. त्यामुळे हायकू रचनेत निसर्गरचनेला फार महत्त्व प्राप्त झाले. जपानमध्ये लोकप्रिय व प्रसिध्द असलेलला हा काव्यप्रकार मराठीत उपेक्षितच राहिला. परंतु शिरीष पै यांनी जपानी हायकूचा अभ्यास केला. त्याचे स्वरुप समजावून घेतले. जपानी हायकूचे भाषांतर केले आणि स्वत: उत्कृष्ट प्रकारची हायकू रचना केली.

त्यानंतर हायकू काव्यरचनेचे आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टिकोनातून हायकूची वैशिष्ट्ये कोणती. याची चर्चा ' हायकूचे तंत्र आणि मंत्र ' या मुद्यात केली आहे. तीन ओळींची रचना, विशिष्ट शब्दांचाउपयोग, पहिल्या आणि तिसऱ्या किंवा दुसऱ्या आणि तिसऱ्या ओळीत साधलेले यमक, निसर्गचित्रण ह्यातील नाट्यमयता, चित्रमयता त्यातून व्यक्त होणारा जीवनानुभव याची चर्चा करुन हायकू हा जपानी काव्यप्रकार मराठीत मुळाबरहुकूम आणणे

का अवघड आहे. या बद्दलच्या विविध मतांचा परामर्श घेतला आहे. तंत्राच्या बाबतीत किंचितम बदल करुन जपानी हायकूच्या आशयाचे अंतरंग मात्र आणण्यात शिरीष पै यांना यश मिळाले आहे. म्हणून त्यांच्याच '' ध्रुवा '' 'हायकूचे दिवस' आणि ' हायकू ' या तीन काव्यसंग्रहाच्या आधारे पुढील प्रकरणात चर्चा केली आहे.

दुसऱ्या प्रकरणात हायकू या काव्यप्रकारातील आशय सौंदर्याचा विचार केला. हायकू या काव्य प्रकारात आशयाच्या दृष्टिकोनातून काही वैशिष्ट्ये आढळतात. सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हायकू रचना ही निसर्ग चित्रणावर असणे आवश्यक आहे. हे निसर्ग चित्रण म्हणजे निसर्ग कविता नव्हे तर निसर्गातील एखाद्या घटनेचे त्यात चित्रण केलेले असते. मराठी कवितेत बालकवी, बा. भ. बोरकर, वसंत बापट, ना. घ. देशपांडे, ना. धों. महानोर यांनी निसर्ग कविता लिहिली आहे. परंतु त्यात निसर्गापेक्षा मानवी भाव भावना, विचार यांना महत्व दिले आहे. अनेक कवींनी अलंकारासाठीसुध्दा निसर्गघटकांचा वापर केला आहे. परंतु हायकूतील निसर्गचित्रण त्यापेक्षा वेगळ्या भूमिकेतून आलेले असते. हायकू काव्यरचना करणाऱ्या कवीला निसर्गात एखादे दृश्य दिसते. ते दृश्य म्हणजे घटना असते. त्या घटनेत त्याला जीवनातील कोणत्यातरी अनुभूतीचा त्याच क्षणी प्रत्यय येतो. त्यामुळे निसर्गातील तश्या घटनेला अपूर्वता प्राप्त होते. हायकूतील निसर्ग वर्णनात ज्या घटनेचे वर्णन केलेले असते त्यात एक प्रकारची नाट्यमयता असते. सामान्यत: हायकूतील पहिल्या दोन ओळीत निसर्गातील घटनेचे वर्णन केलेले असते आणि तिसऱ्या ओळीत निसर्गातीलच घटनेचे असे वर्णन केलेले असते. त्यामुळे पहिल्या दोन ओळीतील घटनेला कलाटणी मिळते. निसर्गातील घटनेचे नाट्यपूर्ण चित्रण हा हायकूचा सर्वात महत्वाचा विशेष होय. अर्थात हे चित्रण वर्णनात्मक नसते तर त्या चित्राचा कवीच्या ' आत्मानुभवाशी ' संबंधी असतो. कवीने जीवनात जे सुखदु:खाचे अनुभव घेतलेले असतात, त्या अनुभवाचे एक साकार रुप त्या कवीला

निसर्गदृश्यात जाणवत असते. यातूनच हायकूमध्ये अनुभवाची संपन्नता जाणवते. नाट्यमयतेप्रमाणे चिंतनशीलता हाही हायकूचा एक विशेष आहे. हायकूतल्या निसर्ग वर्णनातून जीवनासंबंधीचा कोण तातरी गंभीर विचार आपोआपच व्यक्त होतो. विचाराप्रमाणे काही वेळेला जीवनातील भावनेचाही अविष्कार त्यातून व्यक्त होतो. अर्थात विचार किंवा भावना व्यक्त करण्यासाठी हायकू - कवी निसर्गाचा आधार घेत नाही, विचार किंवा भावनेतून त्याला कविता सुचत नाहीत तरत्याच्या प्रेरणेचा केंद्रबिंदु निसर्गातील घटना हाच असतो. त्यामुळे हायकू हा काव्य प्रकार निसर्ग कवितेपेक्षा वेगळाठरतो. याचे सविस्तर चित्रण करुन आशयाची कोणती वैशिष्ट्ये आढळतात त्याचे विवेचन केले आहे.

तिसऱ्या प्रकरणात ' हायकू काव्यप्रकारातील रचनासौंदर्य याचे विवेचन केलेआहे. रचनादृष्ट्या हायकूचेएक विशिष्ट रचना - तंत्र आहे. हायकू हा काव्यप्रकार तीन ओळीचाच असला पाहिजे असा जपानी संकेत आहे. पहिल्यादोन ओळीत एकाविशिष्ट घटनेचे वर्णन असते आणि तिसऱ्या ओळीत दुसऱ्या एखाद्या घटनेचे असे वर्णन केलेले असते की, ज्यामुळे नाट्मय कलाटणी मिळते. त्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे हायकूमध्ये कमीत कमी शब्द वापरावे लागतात. त्यामुळे प्रत्येक ओळीतील प्रत्येक शब्द सूचक व अर्थपूर्ण असावा लागतो. म्हणून मूळ जपानी हायकूमध्ये ५ - ७ - ५ असे शब्दावयव असावेत असा एक संकेत आहे. परंतु जपानी लिपीपेक्षा मराठी लिपी वेगळी असल्याने हा नियम मराठीत पाळता येणे अवघड आहे. यासंबंधी शिरीष पै यांनी रचनेच्या बाबतीत काही स्वातंत्र्य घेतले आहे. भी. मथुरे यांच्या मते ५ - ७ - ५ अशीच रचना असणे आवश्यक आहे. तथापी हे तंत्र अवघड असल्याने एक मध्यम मार्ग असा स्विकारता येईल की, पहिल्या ओळीत जेवढे शब्दावयव असतात तेवढे तिसऱ्या ओळीत असावेत. अर्थात हायकूतील शब्द जेवढे कमी तेवढा हायकूचा प्रभाव अधिक जाणवतो. म्हणून ' अल्पाक्षररमणीयत्व ' हा हायकूचा एक विशेष होय.

हायकूमध्ये कवी चित्रमयशैलीचा उपयोग करीत असतो. निसर्गात घड लेल्या घट नेचे हायकू कवी शब्दचित्र रेखाट त असतो. म्हणूनच हायकू कवीला शब्दाचे सामर्थ्य असावे लागते. हे चित्र रेखाटताना वाक्यरचनेत कोठे ' विराम ' घ्यायचा आहे. याचाही कवीला विचार करावा लागतो. कारण विरामामुळे रचनेत एक प्रकारची लयबध्दता निर्माण होते. यासाठी हायकू कवी आणखी एक तंत्र वापरतात. ते म्हणजे यमकाचे पहिल्या आणि तिसऱ्या ओळीत किंवा दुसऱ्या आणि तिसऱ्या ओळीत यमक साधले जाते. त्यामुळे लयबध्दता निर्माण होते. हायकूचा आणखी एक विशेष म्हणजे त्यातील प्रत्येक शब्द ' प्रतीमापूरीत ' असतो. त्या शब्दातूनअनेकप्रकारची रुपे व अर्थ व्यक्त होत असतात.

हायकू रचनेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात ' रचनेची एकात्मता ' आढळते. प्रत्येक हायकूत कुठे , काय आणि कधी या तीन प्रश्नांची उत्तरे देतात. याचाच अर्थ हायकूमध्ये स्थळ, काळ आणि घट ना यांचे चित्रण असते. हा विचार ॲरिस्टॉटलच्या स्थलैक्य (Unity of place) कालैक्य (Unity of time)आणि कृत्यैक (Unity of action) या विचाराशी जुळणारा आहे. स्थळ, काळ, घट ना यांचे कमीत कमी शब्दांतून चित्रण केल्याने हायकूतील घट नेला दृश्यात्मकता व चित्रमयता प्राप्त होते.

**निष्कर्ष :**

' हायकू ' या काव्यप्रकाराचा अभ्यास केल्यानंतर खालील निष्कर्ष काढता येतात.

१) मराठी साहित्याच्या अभिवृध्दीसाठी वेगवेगळ्या भाषेतील साहित्यप्रकार येणे आवश्यक आहे. असे मर्ढेकरांनी म्हट ले आहे. त्यादृष्टीने शिरीष पै यांनी हायकू हा जपानी काव्यप्रकार आणण्याचा जो प्रकार केला आहे तो स्तुत्य आहे.

२) जपानी भाषेतील हायकूमध्ये ती चित्रलिपी असल्यामुळे अक्षरांना महत्व आहे. त्यामुळे मूळ हायकूत ५ - ७ - ५ अक्षरांची रचना करुन रचना केली जाते. परंतु मराठी भाषेची प्रकृती भिन्न असल्यामुळे ते तंत्र सांभाळणे अवघड आहे. तंत्रापेक्षा मंत्राला अधिक महत्व असल्याने मराठीत हायकू रचना करताना स्वातंत्र्य घेण्यास हरकत नाही. मात्र तीन ओळींची रचना, पहिल्या आणि तिसऱ्या किंवा दुसऱ्या आणि तिसऱ्या ओळीत यमक साधणे योग्य ठरेल.

३) ' हायकू ' या काव्य प्रकारात निसर्गचित्रणाला अधिक महत्व असते. पण हायकू म्हणजे निसर्ग कविता नव्हे तर निसर्गकवितेपेक्षा त्याचे स्वरुप वेगळे असते. हायकूमध्ये केवळ निसर्गाचे चित्रण नसून निसर्गातील घटनेचे वर्णन असते. पहिल्या दोन ओळीत एक घटना वर्णन करुन कवी तिसऱ्या ओळीत विरोधात्मक असलेली घटना वर्णन करतो.

४) ' हायकू ' कवितेतील निसर्गचित्रणात घटनात्मकता असते. त्याचप्रमाणे नाट्यमयताही असते. त्यामुळे हायकूसाठी तीन ओळीची रचना वाचताना वाचकाच्या मनावर प्रभाव पडतो.

५) ' हायकू ' रचनेत कवीजवळ शब्दसामर्थ्य असावे लागते. कारण नेमक्या शब्दांतून, कमीत कमी शब्दातून त्याला निसर्गातील घटनेचे चित्रण करावयाचे असते. म्हणून ' अल्पाक्षररमणीयत्व ' हे हायकूचे वैशिष्ट्य ठरते. तसेच हायकूतील प्रत्येक शब्द प्रतीमापूरीतच असतो.

६) ' हायकू ' काव्यप्रकारात निसर्गाचे चित्रण केलेले असते. त्यामुळे त्यात चित्रमय शैलीचा प्रत्यय येतो.

७) ' हायकू ' हा काव्यप्रकार जसा वस्तुनिष्ठ असतो, तसा आत्मनिष्ठ ही असतो. निसर्गातील दृश्य आणि ते पाहताना कवीला जाणवलेली अनुभूती त्या दृश्यातून जीवनविषयक जाणवलेला एखादा विचार किंवा भावना यांचा आविष्कार झालेला असतो त्यामुळे हायकू या काव्यप्रकारात आपणास चिंतनशीलता जाणवते. त्यामुळे हायकू हा गंभीर व जीवनवादी काव्यप्रकार आहे असे म्हणता येते.

८) हायकूच्या रचना तंत्राची आणि आशयाची सारी वैशिष्ट्ये आत्मसात करुन मराठीत हा काव्य प्रकार रुजविण्याचे कार्य शिरीष पै यांनी केले आहे. या काव्यप्रकाराची त्यांनी चर्चा केली. जपानी हायकूंचे भाषांतर केले आणि स्वतंत्र मराठी हायकू लिहिले. म्हणून त्यांना मराठीतील ' हायकू - सम्राज्ञी ' म्हणण्यास हरकत नाही.

# संदर्भ सूची

## संदर्भ ग्रंथ


1. शिरीष पै :— 'ध्रुवा'
2. शिरीष पै :— हायकूचे दिवस
3. शिरीष पै :— हायकू
4. मर्ढेकर बा. सी. :— साहित्य आणि सौंदर्य
5. जोग रा. श्री. :— अर्वाचीन मराठी काव्य
6. देशपांडे अ. ना. :— आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास भाग 1, 2
7. देशपांडे पु. ल. :— रंग माझा वेगळा - प्रस्तावना
8. डहाके वसंत आबाजी :— वाङमय प्रकार आकलन व रसास्वाद
9. हिरेमठ राजशेखर :— गझल रंग आणि गंध


## नियत कालिके


सत्यकथा :— एप्रिल 1981

सत्यकथा :— ऑक्टोबर 1981

सत्यकथा :— डिसेंबर 1980